

# पहिले पान

संपादक : डॉ. रेखा जगनाळे

दि. ०१ एप्रिल ते दि. ३० एप्रिल २०१८




सौ. अनिषा दुरगकर
टंकलेखन

**सुविचार :–**

ध्येयासाठी अतोनात प्रत्यन करा! जगाने तुम्हाला वेडे म्हटले तरी चालेल कारण वेडेच लोक इतिहास घडवितात आणि शिकलेले लोक तो इतिहास वाचतात!


Institution has developed its vision and mission.
The **vision** of the Institution is "**Determined for excellence in Social Work Education**".
The **Mission** of the Institution is
We at BPNISW shall work continuously to achieve-

1. To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential
3 To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality
4 Providing Social Work Education for both personal and social transformation
5 Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.

**Core values:**

- An unwavering faith in Human dignity An abiding faith in duty towards other individuals and society

The vision and mission of the institution is communicated to the students, teachers, staff and other stakeholders through its publication in the prospectus, institutional website, advertisement in newspapers, Orientation programme and through Alumni Association of the institute. The vision and mission of the institution is in tune with the National Education Policy, 1986. The nature of social work is such that there occurs holistic development of personality of the students. The social work syllabus is reviewed and updated periodically. In addition to this, the institution offers value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students.
bridge courses; value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students.



## महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :–

दि. 14 एप्रिल 2018 ला स. 7.30 वा. महाविद्यालयात प्राचार्य व दलितमित्र पुरस्कर्ते डॉ. महादेवराव नगराळे, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत विद्वतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प–अर्पण करून व मेणबत्ती प्रज्जवलित करून कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी डॉ. नगराळे यांनी स्वानुभवातून दलितांचे शतकाशतकांचे दुःख कथन केले. त्याचबरोबर विशेष अतिथि म्हणून उपस्थित डॉ. दिलीप बारहाते यांनी सुद्धा आपले ग्रामजीवन व दलितांची परवड सांगितली. यावेळी डॉ. विलास घोडे यांनी स्वाभावातून आपल्या उरात दडलेले दलितपण (मनुव्यवस्थेचे) त्याकाळचे सामाजिक वातावरण स्पष्टपणे मांडले.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर यांनी आज आणि काल यातील दलित जीवन उलगडुन सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विलास घोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नंदा पांगळ यांनी केले.



## कार्यकारी सदस्य म्हणून अविरोध निवड :–

दि. 23/04/2018 रोजी नागरिक शिक्षण मंडळ नागपूर या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. याकरिता महाविद्यालयाचे माजी रजिस्ट्रार डॉ. दिलीप बारहाते यांची कार्यकारिणीत कार्यकारी सदस्य म्हणून निवड झाली. याकरिता प्राचार्याच्या कक्षात नवनियुक्त कार्यकारी सदस्य डॉ. दिलीप बारहाते यांचे पुष्पगुच्छ देऊन सहर्ष स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सर्व उपस्थित सी.डी.सी. चे सदस्य व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. बारहाते यांचे अभिनंदन केले.

## बी.एस.डब्ल्यू अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप :–

दि. 4 एप्रिल 2018 रोजी महाव्दियालयातील सत्र 2017–18 अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक प्रा. अनिल सरगर यांनी निरोप संभारंभाचे आयोजन केले.

बी.एस.डब्ल्यू अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला व त्यांना त्यांच्या भावी आयुष्याकरिता तसेच उज्जवल भविष्याकरिता निरोप संभारंभात शुभेच्छा दिल्या. या संभारंभात विद्यार्थ्यांनी एकुण तीन वर्ष शिकत असतानाचे स्वानुभव कथन केले.



## एम. एस डब्ल्यू 4 जी सेमिस्टर ची चाचणी परीक्षा :–

सत्र 2017–18 एम.एस.डब्ल्यू अंतिम वर्षाची चाचणी परिक्षा दि. 23/04/2018 ते 27/04/2018 या काळात महाविद्यालयात घेण्यात आली. या परीक्षेला एकूण 52 विद्यार्थी उपस्थित होते.



## महाविद्यालयात नॅक मार्गदर्शन व चर्चा :–

दि. 17 एप्रिल 2018 रोजी प्राचार्यांचा कक्षात NAAC संबंधी ग्रंथपाल श्रीयुत कान्होलकर यांनी मार्गदर्शन केले व तत्संबंधी प्राचार्य व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी चर्चा केली. श्रीयुत कान्होलकर यांचे मार्गदर्शन नॅक सभासदांना बहुमोलाचे ठरले.

## अभ्यास मंडळावर निवडः–



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठीय समाजकार्य अभ्यासमंडळावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. एस. तुळणकर यांची निवड झाल्या बददल महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठीय समाजकार्य अभ्यासमंडळावर महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. नंदा पांगुळ यांची निवड झाल्या बददल महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन

## डॉ. मंगला हिरवडे यांची ग्रंथालयास भेट

दि. 17 एप्रिल 2018 रोजी डॉ. मंगला हिरवडे ग्रंथालय विभाग व माहितीशास्त्र विभागप्रमुख यांनी ग्रंथालयाला भेट दिली व त्यांनी ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांच्याशी नॅक शी संबंधित महत्वपूर्ण चर्चा केली व काही अति महत्वपूर्ण सूचना दिल्या

